# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/०६/२०२५ (सोमवार)

## नागपुर ग्रामीण जिल्हयांचे पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष ए. पोद्दार यांची Mid-Career Training Program (MCTP) मध्ये सर्वोत्तम पहिल्या पाच अधिकाऱ्यांमध्ये निवड, त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी High Achievement Certificate जाहीर

भारतीय पोलीस सेवेतील पोलीस अधीक्षक ते पोलीस उपमहानिरीक्षक श्रेणीच्या अधिकाऱ्यांना तंत्रज्ञान आणि प्रशासनाच्या बाबतीत नाविन्यपुर्ण विकासाबाबत प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय पोलीस ॲकॅडमी , हैद्राबाद मध्ये Mid-Career Training Program (MCTP) आयोजीत केले जाते. दिनांक २१/०४/२०२५ ते १७/०५/२०२५ पर्यंत राष्ट्रीय पोलीस ॲकॅडमी ,हैद्राबाद येथे आयोजीत Mid-Career Training Program (MCTP) मध्ये संपुर्ण भारतातुन ८२ पोलीस अधीक्षक ते पोलीस उपमहानिरीक्षक श्रेणीच्या अधिकाऱ्यांनी भाग घेतला होता. महाराष्ट्रातील इतर पोलीस अधिकारी यांच्यासह मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांना राज्य शासनाने सदर प्रशिक्षणाला पाठविले होते. **राष्ट्रीय पोलीस ॲकॅडमी ,हैद्राबाद यांनी आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी Mid-Career Training Program (MCTP) चा अंतिम निकाल जाहीर केला असुन त्यात मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांची सर्वोत्तम पहिल्या पाच अधिकाऱ्यांमध्ये निवड करण्यात आली तसेच त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्यांना High Achievement Certificate जाहीर करण्यात आले आहे.**

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी शुभेच्छा देवुन अभिनंदन केले आहे.

## अंमली पदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०८/०६/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, **नंदकिशोर चंदाजी सहानी, वय २२ वर्षे, रा. शिवनगर, कांद्री, कन्हान, हा** शिवनगर कांद्री कन्हान येथे त्याचे राहते घरी अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जात असतांना नमुद आरोपी नंदकिशोर चंदाजी सहानी, वय २२ वर्षे, रा. शिवनगर, कांद्री, कन्हान, हा पोलीसांना पाहुन पळुन गेला.पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपी घरात **४६५ ग्राम वाजनाचा अंमली पदार्थ गांजा किंमती ४,६५०/—रुपये आणि इलेक्ट्रॉनिक वजन काटा किंमती २,०००/— रूपये असा ६,६५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

आरोपी नामे नंदकिशोर चंदाजी सहानी, वय २२ वर्षे, रा. शिवनगर, कांद्री, कन्हान याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ०८/०६/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटर सायकलवर देशी विदेशी दारूची वाहतुक केली जात आहे. नमुद मोटर सायकल बावणगाव बसस्टॉप कडे येत आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ मौजा बावणगाव बसस्टॉप जवळ नाकाबंदी केली असता होन्डा शाईन क्र.एम.एच.४० सी.व्ही. ९७५० ही मोटर सायकल येताना दिसली. पोलीसांनी मोटर सायकल चालकांला थांबण्याचा ईशारा केला असता मोटर सायकल चालकाने न थांबता पुढे निघुन गेला. पोलीसांनी पाठलाग केला असता नमुद मोटर सायकल चालक मोटरसायकल रोडच्या बाजुला सोडुन आंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता नमुद मोटर सायकलवर एका प्लॉस्टीक बोरीत देशी दारु भिंगरी संत्रा नं.१, विदेशी दारु officer choice , विदेशी दारु imperial blue असा मुद्देमाल मिळुन आला . पोलीसांनी पंचासमक्ष

एक होन्डा शाईन क्र.एम.एच.४० सी.व्ही. ९७५० किंमती ७५,०००/— रूपये आणि देशी दारु भिंगरी संत्रा नं.१, विदेशी दारु officer choice , विदेशी दारु imperial blue किंमती **७,०१०/— रूपये एकुण किंमती ८२,०१०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी होन्डा शाईन क्र.एम.एच—४०—सी.व्ही.—९७५० चा चालकाच्या विरूध्द कलम ६५ (अ) (इ) म.दा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**